I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 367-369
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# महिला सक्षमीकरण आधुनिक काळाची गरज

डॉ. किर्ती आ. वर्मा

गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख
जनता महाविद्यालय चंद्रपूर
*Corresponding Author: kirtianandvarma@gmail-com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

महिला आत्मनिर्भर होण्यासाठी महिला सक्षमीकरण अत्यंत आवश्यक आहे. महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम झाले की कौटुंबिक आणि सामाजिक बदल घडून आणू शकतात. महिला सशक्तिकरण करण्याकरिता शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढतो. स्त्री सक्षमीकरणासाठी कुटुंब साहाय्यभूत ठरू शकते. आजच्या स्त्री पुढे जुन्या काळातील स्त्रियांपेक्षा फार मोठा संघर्ष उभा टाकलेला आहे. काळानुसार प्रश्नांचा स्वरूप बदललेला आहे. हे आव्हान ती कसं स्विकारते हे तिने प्राप्त केलेले आहे. मागील दोन दशकांपासून स्त्री शिक्षण क्षेत्रामध्ये परिपूर्ण झाले आहे व स्त्रियांच्या व शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले पुढे आले आणि आज त्यांच्यामुळेच आपण स्त्रीला पुरुषांबरोबर शिक्षणाचा हक्क मिळालेला आहे. स्त्रीला शिक्षण तर मिळाले पण त्यांची अनेक गरजे राहिली ती योग्य कर्तुत्व देण्याची आणि तिला सक्षम बनविण्याची आपल्या संभोवतालच्या समाजामध्ये वावरताना आपल्याला सामाजिक गरजेनुसार आणि व्यवस्थेनुसार झाले पाहिजे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न केले पाहिजे. या प्रयत्नांच्या मदतीने स्वत:ची आव्हाने कसे सोडवेल तर जीवनात यश मिळू शकतील हे या विषयाचा सारांश आहे.

**बीजशब्द :** स्त्री शिक्षण पुरुषांचे हक्क शैक्षणिक सक्षमता हुंडा पद्धती

**प्रस्तावना :**

आधुनिक काळामध्ये महिला सशक्तिकरण हा चर्चेचा विषय बनला आहे या खासकर मागासवर्गीय व प्रगतशील देशांमध्ये महिला सशक्तिकरण यावर भर दिला जात आहे, कारण आज प्रत्येकाला असा समज आहे की देशातील स्त्री यांचा प्रगती शिवाय देशांची प्रगती शक्य नाही. आपल्या ग्रंथामध्ये महिलांना असं म्हटलं गेला आहे की ''यंत्र नार्यस्तू पूज्यते रमन्ते तंत्र देवता'' अर्थात ज्या ठिकाणी स्त्रियांची पूजा होते, त्यांचा मान सन्मान होतो त्या ठिकाणी देव देवता रममाण होतात.

आधुनिक युगात महिला सक्षमीकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे सक्षमीकरण आणि सशक्तीकरण हे दोन्ही शब्द सारखेच आहेत. एखाद्या व्यक्ती सक्षम असणे याचा अर्थ होतो. हे स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ शकतो. कोणाच्याही सहाय्या शिवाय जीवन जगू शकतो.

भारत देश हा खूप लोकसंख्येने वाढलेला देश आहे. महिला व पुरुष यांना दोघांना ही इथे बरोबरीचे स्थान दिले आहे. या समरुद्व भारतात तरी पण स्त्रीला कमी पणाचा दर्जा दिला जातो, म्हणून आजही ग्रामीण भागात स्त्रियांचा छळ केला जातो. त्यांना कमी पणीचा समजला जाता. स्त्रियांना हे वेडेपणा थांबवण्यासाठी स्वत:ची लढाई स्वत: लढली पाहिजे. स्त्रियांना महिला दुर्गा सरस्वती झालेच पाहिजे. जागे व्हा जागे व्हा तेव्हा स्त्रियांचे सशक्तिकरण म्हणजे स्त्रियांचा संपूर्ण विकास होईल. महिला पुरुषा पेक्षा समृद्ध आहे ते कसे ही स्त्री घरचा आणि नोकरी, बाहेरचं दोन्ही काम सांभाळतो स्त्री बहार नोकरी करण्यासाठी गेली असता किंवा कंपनीमध्ये गेली असता तिला खालच्या नजरेने पाहत असतात. तेव्हा तिला सगळ्यांचे तोंड द्यावे लागते. आजची महिला ती पहिल्या सारखी राहिली नाही. आजची महिला प्रत्येक क्षेत्रात उंच झेप घेऊन आपले कर्तव्य उभारून पसरवलेले आहेत. तरी सुद्धा महिलांना पाहिजे तेवढा योग्य तो मान आणि ताकद मिळणे खूपच गरजेचे आहे, आणि त्यासाठी स्त्री सशक्तिकरण करणे अत्यंत गरजेची बाब आहे. महिला ही आर्थिक, सामाजिक आणि मानसिक दृष्ट्या सुरक्षित आणि स्वतंत्र आजीची स्त्री शिक्षणासाठी खेळ खेळण्यासाठी किंवा नोकरीसाठी बाहेर पडतात तेव्हा सरकारने त्यांच्या संरक्षणाची व त्यांच्यावर कुठलाही अत्याचार किंवा छळ होता कामा नये असे नवे नियम काढले पाहिजे. महिलांना शिक्षण तर मिळाले पण गरज राहिली ती योग्य कर्तुत्व देण्याची आणि तिला सक्षम बनवण्याची. आजच्या युगात स्त्रीला सामाजिक गरजेनुसार आणि व्यवस्थेनुसार राहावे लागते. महिलांना समाजातील रूढी–परंपरा आणि बंधनांना धरून चालावे लागते. महिला अशी चालत असतांना तिथे पुरुष आणि स्त्री असे दोन

व्यक्तीचे विभाजन असल्याची खूप मोठी बाब आहे. महिलाचे हक्क आणि पुरुषांचे हक्क यामध्ये नेहमी भेदभाव का बर केला जातो. महिलाच्या सक्षमीकरण स्वातंर्त्याकडे हक्का कडे योग्य पद्धतीने लक्ष दिले पाहिजे. स्त्रियांना सक्षमीकरण करताना प्रथमता स्त्रियांच्या आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र बनले पाहिजे. तिला थोड्या पैशासाठी कोणाजवळ हाथ पसरविल्याची वेळ आली नाही पाहिजे. स्त्रीच्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या सहायाने ती नोकरी करून, काम करून, आर्थिक दृष्ट्या प्रबळ झाली आहे. आजची महिला फक्त चूल आणि मुल सामान्य पुरती राहिले नाही ती औद्योगिक क्षेत्रात, शिक्षण आणि तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रात स्त्री आपल्या बघायला मिळत आहे. बदलत्या परिस्थितीत महिलांची भूमिका सुद्धा बदलत जात आहे. आजची महिला कोणाच्या घरची मुलगी, सून, पत्नी व आई या सर्व नात्या संभाळते व या नात्याने व्यतिरिक्त अनेक क्षेत्रात काम करताना दिसत आहे. त्यावरून आपल्याला कळते की महिलांचा विकास तर झालाच आहे, परंतु विकासाला सर्वांगीण विकास असे म्हणून शकत नाही. कारण समाजाचा काही भाग खूप पुढे गेला आहे, प्रगत झाला आहे पण याच समाजाची काही भाग अजूनही मागे राहिली आहे. महिलांना स्वत:च्या स्वातंर्त्यासाठी लढण्याचा हक्क सुद्धा नाही महिलांना प्रगतीची दिशाच मिळालेले नाही. नवऱ्याची मारहाण कुटुंबामुळे मिळालेला छळ आणि बळी पडत आहे. नात्यात गोत्यात दोन बाजू असतात एक बाजू अतिशय सुंदर असली की दुसरी बाजू कुरूप आहे. आपल्या देशाचे स्त्रिया प्रगत झालेल्या आहेत महिला कुठे शिक्षिका तर डॉक्टर, इंजिनियर, अभिनेत्री, मंत्री अशा देशाच्या अनेक सर्वोच्च पदावर महिलांनी स्थान पटकाविला आहे. ग्रामीण भागात अनेक स्त्रिया अंधश्रद्धा मारहाण आणि हुंडा या अभावी मारताना दिसत आहे त्यांना न्याय सुद्धा मिळत नाही अशा महिलांना न्याय देण्यासाठी प्रत्येक शिक्षित प्रगतशील स्त्री पुढे आलीच पाहिजे. महिला सक्षमीकरण हा या मुद्दे प्रत्येक राज्य केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या मोहिमेत आलाच पाहिजे. त्याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे. महिला सक्षमीकरण ही बाब आपल्या समाजासाठी खूप महत्त्वाचे आहे त्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे. देशातील सर्व पुरुषांनी सहकार्य केले पाहिजे. एखादी महिला स्वत:वर होणाऱ्या अन्याया विरुद्ध स्वत: आवाज करते व लढते तेव्हा ती खर्या अर्थाने सक्षम असेल व आपल्या समाजातील महिला सक्षमीकरण करण्याची गरज सुद्धा भासणार नाही हे मात्र नक्कीच आहे.

महिलाची मानसिकता बदलणे अत्यंत महत्त्वाची आहे ग्रामीण भागा मध्ये महिला आजही स्वत: निर्णय घेऊ शकत नाही तिथे त्यांच्या पैशावर अवलंबून राहतात त्यांचे निर्णय सक्षम वाढणे गरजेचे आहे. अनेक त्यांना त्या घटनेनुसार अनेक अधिकार दिले आहेत. याची माहिती त्यांच्या पर्यंत पोहोचली पाहिजे त्यांचा प्रबोधन झालं पाहिजे. कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय स्थळ क्षेत्रांमध्ये महिला व पुरुषांच्या बरोबरची हक्क व दर्जा प्रदान करून देणे. विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री–पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला आधुनिक महिला सक्षमीकरण असे म्हणतात. स्त्री अजून ही शंभर टक्के सक्षम आहे. आपण मान्य करू शकत नाही. महिला सक्षमीकरणाकरीता पुढील काही मुद्दे महत्त्वाचे ठरतात.

१) लैंगिक आरोग्य
२) आर्थिक सक्षमता
३) शैक्षणिक सक्षमता
४) राजकीय सक्षमता
५) आर्थिक बचत गट
६) मानसिक सक्षमता

भारतातील बहुसंख्य स्त्रिया घर या कामात गुंतलेले असतात कमी उत्पादनांची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांना स्त्रियांकडे दिली जातात, म्हणून स्त्रियांना आर्थिक स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिक दृष्ट्या सक्षमीकरण होण्याचे प्रमाण आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय इत्यादी क्षेत्रात कृषी क्षेत्रात काम करत असतात परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केली जात नाही. त्यामुळे आर्थिक सक्षमीकरण चालना मिळत नाही.

**उद्देश :–**

१) महिलांच्या विकासासाठी सरकारच्या अनेक योजना असून त्या बद्दल ग्राम पातळीवर जनजागृतीच्या अध्ययन करणे.

२) महिला आता प्रत्येक क्षेत्रात प्रगतीकडे वाटचाल करत असून महिला सक्षमीकरणात या काळाचे अध्ययन करणे.

**निष्कर्ष :–**

या विषया वरून असे निष्कर्ष काढण्यात आले की स्त्रियांचा विकास झालाच आहे परंतु त्या विकासाला सर्वांगीण विकास असे म्हणून शकत नाही. कारण समाजाचा काही भाग खूप पुढे गेला आहे. प्रगती झाली पण याचा समाज काही भाग अजूनही मागे राहिलेले आहे. त्यांचा विकास झालेले नाही या भागातील स्त्रियांवर

आजही अत्याचार होतात. अनेक ही असूनही प्रत्येकात स्त्रिया अंधश्रद्धा, हुंडा पद्धती अशा प्रकारे बळी पडलेले आहेत. स्त्रियांना प्रगतीची दिशा मिळाली नाही. नवऱ्याची मारणार कुटुंबामध्ये मिळालेले छळ यांना बळी पडत आहे. म्हणण्याचा अर्थ असा की न्यायला दोन बाजू असतात एक बाजू अतिशय सुंदर आणि दुसरी बाजी कुरूप आहे तर दुसरीकडे ग्रामीण भागामध्ये अनेक शहरी भागात अनेक स्त्रिया अंधश्रद्धा मारणार आणि हुंडा या अभावी वाढताना दिसत आहे. त्यांना न्याय सुद्धा मिळत नाही. सरकार स्त्रियांना उपलब्ध होतील तेवढ्य सुविधा प्राप्त करून दिल्या पाहिजे. समाजामध्ये स्त्रियांना समान दर्जा मिळाला पाहिजे. महिला सक्षमीकरण ही बाब आपल्या समाजासाठी खूप महत्त्वाचे आहे त्यासाठी सर्वांनी पुढे आलेच पाहिजे स्त्रियांनाही योग्य तो सन्मान दर्जा आणि शक्ती मिळविण्यास मदत होईल.

**उपाय योजना : –**

आधुनिक महिला सक्षमीकरण यांची योजना करताना महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात काही बदल करण्यात आले. २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्यावर आर्थिक दर्जात सुधारणा, परंपरा स्वयंसेवी संस्था सहभाग, स्वयं सहायता, बचत गट विकास अशा प्रकारच्या योजना यांच्या प्रमुख्याने विचार केला गेला. शासकीय निमन शासकीय यंत्रणा मध्ये स्त्रियांना नोकरी तीस टक्के आणि स्वराजय स्थानिक संस्थेत ५०टक्के आरक्षण मिळावे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान च्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षणाची व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध केली पाहिजे.

**सूचना : –**

महिला सक्षमीकरणासाठी काही सूचना देण्यात येत आहे

१) बेटी बचाव बेटी पढाव योजना

२) महिला हेल्पलाइन योजना

३) वन सटॉप सेंटर योजना

४) नारी शक्ती पुरस्कार

५) राज्य महिला सन्मान आणि जिल्हा महिला सन्मान पुरस्कार विजेते.

६) महिला पोलीस स्वयंसेवक

७) महिला शक्ती केंद्र

८) निर्भया

९) महिला कार्यरत महिला व वसतिगृह.

१०) महिलांच्या शिक्षणासाठी योजना.

११) महिला करिता लघु उद्योग क्षेत्रासाठी विपणन योजना.

अशा कितीतरी योजना उपलब्ध आहेत. अनेक महिलांना यातून स्वयंरोजगार देणार उद्योग सुरू केले आहेत

**संदर्भ :**

महिला सक्षमीकरण ही काळाची गरज ह्म ऑक्टोंबर २०१६.

लोकसत्ता संपादनडॉक्टर ज्योती भाकरे, किरण शिंदे.

वुमन एम्पॉवरमेंट घक्त जुलै २०१९

लोकराज्य महाराष्ट्र शासन

महिला स–शक्तिकरण, आशा कौशिक २००४ पॉइंटर पब्लिशर्स जयपुर.